-: <u>प्रेसनोट</u> :-

## पिंपरी पोलीस ठाणे हद्दित राहणारा कुप्रसिध्द गुन्हेगार, राहुल ऊर्फ दगड्या बाबुराव टोणपे, यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्दतेचे आदेश दिले.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दित गुन्हे करणारे गुन्हेगार यांचा अभिलेख तपासून त्यांचेवर परीणामकारक व कठोर कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिलेले असून त्याप्रमाणे कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी पिंपरी, निगडी, चिंचवड, सांगवी पोलीस ठाणेचे हद्दित कोयता सारखी जीवघेणी हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न करणे, दंगा करून गंभीर दुखापत, जबरी चोरी, गर्दी मारामारी, व बेकायदेशीररित्या विनापरवाना घातक शस्त्रे जवळ बाळगणे,** यासारखे गुन्हे करणारा कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **राहुल ऊर्फ दगड्या बाबुराव टोणपे, वय-२७ वर्षे, रा. मिलींदनगर, पिंपरी, पुणे,** यास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, यांनी एम.पी.डी.ए. कायद्याखाली स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे, येथे दिनांक १३/१०/२०२२ रोजी सदर कायद्यान्वये स्थानबध्द् करण्यात आले आहे.

कुप्रसिध्द गुन्हेगार नामे, **राहुल ऊर्फ दगड्या बाबुराव टोणपे, वय-२७ वर्षे, रा. मिलींदनगर, पिंपरी, पुणे,** याने पिंपरी, निगडी, चिंचवड, सांगवी पोलीस ठाणेचे हद्दित सन २०१६ पासून आत्तापर्यंत १६ गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याच्या गुन्हयांचा चढता आलेख पाहून तसेच मा. पोलीस आयुक्त यांचे आदेशा नुसार व.पो.नि. श्री. शंकर आवताडे, पिंपरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. अनिरूध्द सावर्डे, पो.ना. ओंकार बंड, म.पो.ना. माया कोल्हे, पिंपरी पोलीस ठाणे यांचे पथकाने त्याचेवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई करणे कामी प्रस्ताव डॉ. सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त यांचे मार्फतीने मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे सादर केला होता.

सदर प्रस्ताव सादर करण्याची कामगीरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे, डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पोलीस हवालदार, सचिन चव्हाण, पो.ना. कारभारी पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी केली आहे.

**सन २०२२ मध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये**

**एम.पी.डी.ए. अंतर्गत स्थानबध्द करण्यात आलेले गुंड**

१) मेहबुब दस्तगीर पटेल, - वाकड पोलीस ठाणे

२) दिपक सुरेश मोहिते, - पिंपरी पोलीस ठाणे

३) अक्षय ऊर्फ जोग्या हेमंत जाधव, - सांगवी पोलीस ठाणे

४) राहुल ऊर्फ दगड्या बाबुराव टोणपे, - पिंपरी पोलीस ठाणे

**मोका अंतर्गत १४ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील १०१ गुन्हेगारांवर कारवाई**

१) आकाश उत्तम शिनगारे, वय-२४ वर्षे, रा. भिम शक्तीनगर झोपडपट्टी, मोरेवस्ती, चिखली, पुणे, (टोळी प्रमुख) व इतर ०३ – चिखली पोलीस ठाणे

२) लक्ष्मण बाबुराव धोत्रे, वय-३४ वर्षे, रा. शेल पिंपळगाव, खेड, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०६** - चाकण पोलीस ठाणे

३) रामदास मारुती साळुंखे, वय-३३ वर्षे, रा. दवणेवस्ती, आंबेठाण, खेड, पुणे. **(टोळी प्रमुख) व इतर ०४ –** चाकण पोलीस ठाणे

४) देवा ऊर्फ देवानंद भिमाशंकर जमादार, वय २२ वर्षे, रा. दांगटवस्ती, दत्तनगर किवळे, देहूरोड, पुणे. **(टोळी प्रमुख) व इतर ०८ –** देहुरोड पोलीस ठाणे

५) अमित भुरेलाल सौदे, वय-२५ वर्षे, रा. साईबाबा मंदिराजवळ, आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे. **(टोळी प्रमुख) व इतर ०५** - पिंपरी पोलीस ठाणे

६) गणेश हनुमंत मोटे, वय-२३ वर्षे रा. कवडेनगर, गल्ली नं ०३, सांगवी, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर १३** - सांगवी पोलीस ठाणे

७) अरुण बिपीन परदेशी, वय-२१ वर्षे, रा. बौध्दनगर, बि.नं. १६ चे पाठीमागे, हनुमान मंदिराजवळ, पिंपरी, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०५ -** पिंपरी पोलीस ठाणे

८) सनी ऊर्फ सोन्या सुरेश शिंदे, वय-२९ वर्षे, रा. कान्हेवाडी तर्फ चाकण, खेड, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०३** – चाकण पोलीस ठाणे

९) सागर ऊर्फ बबल्या बापू खताळ, वय-२३ वर्षे, रा. ड्रायव्हर कॉलनी, काळेवाडी फाटा, थेरगांव, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०४** - वाकड पोलीस ठाणे

१०) गणेश ऊर्फ केदार नानासाहेब गायकवाड, वय ३६ वर्षे, रा. आय.टी.आय रोड, औंध, पुणे. **(टोळी प्रमुख) व इतर ०५** - सांगवी पोलीस ठाणे

११) निहालसिंग गिरवर गुदेन, वय-३४ वर्षे, रा. औड, ता. सोनकच्छ, जि. देवास, मध्यप्रदेश, **(टोळी प्रमुख) व इतर १०** – शिरगांव पोलीस ठाणे

१२) अनिल उर्फ संतोष उर्फ अन्या गोरख जाधव, वय-३० वर्षे, रा. सोपान नाना बालघरे यांची रुम, बालघरे वस्ती, कुदळवाडी, चिखली, पुणे. **(टोळी प्रमुख) व इतर ०६** – पिंपरीपोलीस ठाणे

१३) आदर्श ऊर्फ छोट्या अशोक मगर, वय-२१ वर्षे, रा. बि.नं. ९/बी/१०/११, राहुलनगर, निगडी, पुणे, **(टोळी प्रमुख) व इतर ०९** – निगडी पोलीस ठाणे

१४) जितेंद्र ऊर्फ जित्या आनंदा जाधव वय २१ वर्षे रा.चिकन चौक संग्राम नगर झोपडपट्टी, ओटास्कीम निगडी पुणे **( टोळी प्रमुख ) व इतर ०६** – पिंपरी पोलीस ठाणे

**वरील प्रमाणे १४ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील १०१ गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये प्रभावी प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.**

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.